Wainganga Bahu-Uddeshiya Vikas Sanstha's
WAINGANGA COLLEGE
OF ENGINEERING AND MANAGEMENT
An Autonomous Institute
॥ सा विद्या या विमुक्तये ॥
7391058481/82
contact@wcem.edu.in
www.wcem.edu.in
Approved by AICTE, DTE, Govt. of Maharashtra | Affiliated to RTM Nagpur University | NAAC Accredited "A" Grade

WCEM, EXAMINATION CELL

**WCEM/Exam/Re-Sit/ESE/Sum-26/04** **Date: 29 Sep 2026**

# Re-Sit Examination Summer-2026 Postponement Notice

With reference to the RTM Nagpur University Letter No. 453 dated 28 July 2026, and in view of the **Orange Alert** issued by the **India Meteorological Department (IMD)** and the directives of the **Collector, Nagpur District**, **29 July 2026** has been declared a holiday for all students.

Accordingly, the **Re-Sit Examination scheduled on 29 July 2026** is **postponed**.

The postponed examination will now be conducted on **Saturday, 01 August 2026**, as per the same time mentioned in the original timetable.
https://www.wcem.edu.in/time-table

**All remaining Re-Sit examinations will be conducted as per the existing regular examination timetable without any changes.**

Students are advised to take note of the revised schedule and make necessary arrangements accordingly.

Controller of Examinations
Wainganga College of
Engineering and Management
Dongargaon, Nagpur

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन विभाग)**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईट मार्ग, नागपूर – ४४० ०३३.

E-mail : arga@nagpuruniversity.nic.in


क्रमांक: रातुमनावि/साप्र/४५३ — दिनांक : २८ जुलै, २०२६

## परिपत्रक

संदर्भ : मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र क्रमांक जि.निक/म.स./न.आ.व्य/कावि.२६२/२०२६, दिनांक २८ जुलै, २०२६.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसूचनेनुसार नागपूर जिल्ह्यात दिनांक २८ ते ३० जुलै, २०२६ या कालावधीमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला असल्यामुळे व नागपूर जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे नागपूर जिल्ह्यातील सर्व सरकारी, खाजगी अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस मध्ये जाणाऱ्या [(संपूर्ण नागपूर शहर व नागपूर शहर लगतच्या तालुका म्हणजेच नागपूर ग्रामीण, हिंगणा, कामठी तालुक्यांमधील क्षेत्रामध्ये (नागपूर महानगरपालिका क्षेत्रासह)] विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर यांच्या संदर्भिय पत्राला अनुसरून **बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजीची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.**

त्यानुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील, संचालीत महाविद्यालयांमधील व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या नागपूर शहर व नागपूर शहर लगतच्या तालुका म्हणजेच नागपूर ग्रामीण, हिंगणा, कामठी तालुक्यांमधील क्षेत्रामधील (नागपूर महानगरपालिका क्षेत्रासह) महाविद्यालयातील **विद्यार्थ्यांना दिनांक २९ जुलै, २०२६ रोजीची सुट्टी जाहिर करण्यात येत आहे.**

विद्यापीठातील प्रशासकीय विभाग, सर्व शैक्षणिक विभाग, संचालीत व संलग्नित महाविद्यालय दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी सुरू राहतील. सदर सुट्टी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय राहणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यापीठ परिश्रेत्रातील वर्धा, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्तबाबत जर त्यांच्या जिल्ह्याच्या मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याद्वारे आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार योग्य कार्यवाही आपल्या स्तरावर कृपया घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

(गणेश कुमकुमवार)
सहायक कुलसचिव (सा.प्र.)

प्रतिलिपी:

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य.
३. नागपूर शहर व नागपूर शहर लगतच्या तालुका म्हणजेच नागपूर ग्रामीण, हिंगणा, कामठी तालुका क्षेत्रामधील (नागपूर महानगरपालिका क्षेत्रासह) विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्तबाबत कृपया सूचित करावे.

२८/७/२६

(शैलेश राठोड)
अधीक्षक (सा.प्र) (अति. प्रभार)

# जिल्हा परिषद नागपूर

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालय
जुने सचिवालय समोरील इमारत २ रा माळा सिव्हिल लाईन नागपुर ४४०००१
दुरध्वनीक्रमांक : ०७१२-२९५७१८०
ई-मेल : rmsanagpur@gmail.com

क्रमांक/जिपना/शिक्षण/माध्य./उमावि/ 4706 /2026,     दिनांक - 28 / 07 /2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व व्यवस्थापन शाळा
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा
(नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, हिंगणा व कामठी )
नागपूर जिल्हा

**विषय- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सुट्टी जाहिर केल्याबाबत.**

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नागपूर यांचे कडील आदेश क्र. जिनिक/म.स./न.आ.व्य/कावि-२६२/२०२६ दिनांक २८/७/२०२६

उपरोक्त विषयावरील मा.जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडील संदर्भीय आदेश सोबत जोडले आहेत. सदर आदेशामध्ये नमुद केल्यानुसार नागपूर जिल्हयात दिनांक २८ ते ३० जुलै २०२६ या कालावधी मध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला असल्यामुळे नागपूर जिल्हयातील सर्व सरकारी व खाजगी अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये व कोचींग क्लासेस यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपुर्ण नागपूर शहर नागपूर ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यामधील शाळांना दिनांक २९ जुलै २०२६ बुधवार रोजी सुट्टी जाहिर करण्यात आली आहे.

सहपत्र :- संदर्भीय आदेश

( अनिल दहीफळे )
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१.मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
२. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**

फोन नंबर ०७१२/२५६२६६८
ई-मेल rdc_nagpur@rediffmail.com

क्र.जिनिक/म.स./न.आ.व्य/काय.२६२/२०२६
दिनांक:- २८/०७/२०२६.

वाचा:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१९/प्र.क्र.१९९/एसडी.२, दि. ०२/०८/२०१९
३. भारतीय हवामान विभाग, यांची दिनांक २८/०७/२०२६ रोजीची हवामान विषयक पूर्वसूचना.

## आदेश

**ज्याअर्थी,** भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसुचनेनुसार **नागपुर जिल्ह्यात दिनांक २८ ते ३० जुलै २०२६ या कालावधी मध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे.** नागपुर जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. आज दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता पर्यंत नागपूर शहरात १०८ मिमी येवढ्या पावसाची नोंद झालेली आहे. नागपुर जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस झालेला असून भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या हवामान अंदाजानुसार जर अतिमुसळधार पाऊस पडल्यास दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी नागपूर जिल्ह्यात अनेक भागात अचानक पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपुर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये या करिता जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, शाळा व महाविद्यालये मधिल विद्यार्थांना उद्या दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे.

**आणि ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र. २ शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी** मी, कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपुर मला आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० व ३४ व संदर्भ क्र. २ शासन परिपत्रक नुसार प्राप्त अधिकारान्वये **नागपुर जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये व कोचिंग क्लासेस यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण नागपूर शहर व नागपूर शहर लगतच्या तालुका म्हणजेच नागपूर ग्रामीण, हिंगणा, कामठी तालुक्यांमधील क्षेत्रामध्ये (नागपुर महानगरपालिका क्षेत्रा सह) दिनांक २९ जुलै, २०२६, बुधवार रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.**

जिल्हादंडाधिकारी नागपूर

(कुमार आशीर्वाद),
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपुर